**"मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी" उपक्रम सुरू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२४/ प्र. क्र. १४६ (ई-११८०५१६)/ एसडी-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- ०६ मे, २०२६.

**वाचा:-**

(१) संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था (प्रादेशिक विद्या प्राधिकरण), नागपूर यांचे पत्र क्र. रा.वि. शि.सं (प्रा.वि.प्रा.)/मुख्य विज्ञान वारी, दि. १८.०७.२०२५.

(२) संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था (प्रादेशिक विद्या प्राधिकरण), नागपूर यांचे पत्र, क्र. रा.वि. शि.सं (प्रा.वि.प्रा.)/ प्रशा-३/ ७३/ २०२६, दि. १०.०२.२०२६.

**प्रस्तावना:-**

विद्यार्थ्यांच्या विज्ञान आणि गणित विषयातील सर्जनशीलता, कल्पकता व नवनिर्मितीच्या वृत्तीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्यामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येतात.

(अ) "राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन" हा या उपक्रमाचा एक भाग आहे. राज्यपातळीवर गुणानुक्रमे निवडलेल्या निवडक प्रदर्शनीय वस्तूंची निवड पुढील वर्षी होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शनासाठी करण्यात येत असते.

(ब) विज्ञान प्रदर्शनाची सुरुवात ही तालुकास्तरापासून होते. तालुकास्तरावरील विजयी विद्यार्थी जिल्हास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनात आणि जिल्हास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनात विजयी झालेले विद्यार्थी राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनात सहभागी होत असतात.

(क) दरवर्षी राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाची जबाबदारी महाराष्ट्रातील एका जिल्ह्याकडे दिली जाते. राज्य विज्ञान संस्था ( प्रादेशिक विद्या प्राधिकरण ), नागपूर ही संस्था समन्वयक यंत्रणा/ संस्था म्हणून काम करीत असते.

(ड) प्रत्येक वर्षी राज्यातील तालुकास्तर, जिल्हास्तर व राज्यस्तरावर विज्ञान प्रदर्शने आयोजित करण्यात येत असतात. या स्पर्धांमध्ये अव्वल ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात येत असते. या प्रदर्शनामध्ये विद्यार्थी सहभाग वाढावा व विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाची आवड निर्माण व्हावी, तसेच विज्ञान प्रदर्शने महाराष्ट्रात अधिक व्यापक व प्रेरणादायी होण्यासाठी विशेष उपक्रम सुरु करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

२. राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० मध्ये संशोधनाच्या गुणवत्तेमध्ये परिवर्तन तसेच, विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी एक सर्वसमावेशक दृष्टिकोन विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे. यास अनुसरून राज्यस्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या विज्ञान प्रदर्शनात उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंत)

आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर (इयत्ता ९ वी ते १२ वी) मधील विद्यार्थ्यांचा समावेश असतो. सदर विज्ञान प्रदर्शनांमध्ये विद्यार्थी सहभाग वाढावा व विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाची आवड निर्माण व्हावी, याकरिता तालुकास्तरावर प्रथम येणाऱ्या प्रत्येकी ६ अशा एकूण २१४८ विद्यार्थ्यांना विभागीय सायन्स सेंटरला (नागपूर, मुंबई, पुणे) भेट, जिल्हास्तरांवर निवड झालेल्या उत्कृष्ट विद्यार्थ्यांना बंगळूरू येथील इस्त्रो (ISRO) केंद्राला भेट आणि राज्यस्तरीय उत्कृष्ट ५१ विद्यार्थ्यांना अमेरिका येथील नासा (NASA) केंद्राला भेट देण्याची संधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० मध्ये विज्ञान शिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना अनुभवाधारित व प्रयोगशील शिक्षणाच्या माध्यमातून विज्ञान अधिक समजण्यास सोपे करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल लॅबस्, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि संगणकीय विचार यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच, संशोधनवृत्ती आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन देऊन विद्यार्थ्यांना भविष्यासाठी सक्षम बनविण्याचा उद्देश आहे. याकरिता "मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी" हा उपक्रम सुरू करण्यास व या उपक्रमांतर्गत खालीलप्रमाणे भेटींचे आयोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(१) राज्यातील तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात प्रथम येणाऱ्या प्रत्येकी ६ असे एकूण २१४८ विद्यार्थी (३५८ X ६ = २१४८) व त्यांच्या सोबतच्या २० पर्यवेक्षक / विज्ञान शिक्षक यांना रमन सायन्स सेंटर, नागपूर/ पिंपरी-चिंचवड सायन्स सेंटर, पुणे किंवा नेहरु तारांगण, मुंबई यापैकी जे विज्ञान केंद्र नजीक असेल, त्या ठिकाणी भेट देण्याचे आयोजन करण्यात यावे.

(२) राज्यातील जिल्हा स्तरावरील प्राथमिक व माध्यमिक (सर्वसाधारण गट), प्राथमिक व माध्यमिक (दिव्यांग गट) आणि प्राथमिक व माध्यमिक (आदिवासी गट) मधून निवड झालेल्या एकूण १८० विद्यार्थी व ०८ पर्यवेक्षक / शिक्षक यांना बंगळूरू येथील इस्त्रो (ISRO) केंद्राला भेट देण्याचे आयोजन करण्यात यावे.

(३) राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभागी झालेल्या उत्कृष्ट ५१ विद्यार्थी, ०१-शिक्षक, ०१-शिक्षिका व ०२ प्रशासकीय अधिकारी / समन्वयक अशा एकूण ५५ व्यक्तींना अमेरिका येथील नासा (NASA) केंद्राला भेटीचे आयोजन करण्यास व याकरिता येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

(४) राज्यातील तालुकास्तर व जिल्हास्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्या-त्या जिल्हास्तरावरील जिल्हा योजनेत (DPDC) तरतूद करून निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

## २. "मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी" चे स्वरूप:-

(१) एन. सी. ई. आर. टी., नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्याचप्रमाणे राज्यशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांनुसार तालुकास्तर, जिल्हास्तर आणि राज्यस्तरावरील बाल वैज्ञानिक प्रदर्शनांचे आयोजन करण्यात यावे.

(२) तालुकास्तरावर बाल वैज्ञानिकांना त्या-त्या विभागातील नजिकच्या सायन्स सेंटरला भेट देण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद/ शिक्षण निरिक्षक यांच्या स्तरावर समिती गठित करण्यात यावी. विज्ञान प्रदर्शनाच्या मूल्यमापनासाठी (i) उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंत) (ii) माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर (इयत्ता ९ वी ते १२ वी) असे दोन गट निश्चित करावे. यामधून तालुकास्तरावरील प्राथमिक व माध्यमिक स्तरातील सर्वसाधारण, दिव्यांग व आदिवासी गटातून प्रत्येकी प्रथम क्रमांकावरील एक याप्रमाणे ०६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात यावी. त्यामुळे तालुकास्तरावरील पात्र विद्यार्थ्यांची संख्या २१४८ (३५८×०६) इतकी असून २० पर्यवेक्षक / विज्ञान शिक्षक अशा एकूण २१६८ व्यक्तींना प्रतिव्यक्ती कमाल रु.२०,०००/- इतका खर्च त्या-त्या जिल्हास्तरावरील जिल्हा योजनेत (DPDC) तरतूद करावी.

(३) मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारीतील तालुका स्तरावर विद्यार्थ्यांची निवड करणे, भेटीचे स्थळ निश्चित करणे, भेटीचे नियोजन करणे याची जबाबदारी तालुकास्तरावरील नियंत्रक म्हणून गट शिक्षणाधिकारी यांची राहील. गट शिक्षणाधिकारी यांनी भेटीच्या सर्व खर्चाचा हिशोब गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांच्याकडे सादर करावा.

(४) राज्यातील एकूण ३४ जिल्हे व मुंबई (उत्तर/ पश्चिम/ दक्षिण) मधील ०३ याप्रमाणे एकूण ३७ ठिकाणी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन राबविण्यात येते. यापैकी १६ आदिवासी जिल्हे आहेत. जिल्हास्तरीय प्रदर्शनात तालुकास्तरीय प्रदर्शनातून निवड झालेले विद्यार्थी सहभागी होतात. जिल्हास्तरावरील विज्ञान प्रदर्शनांमधून विद्यार्थ्यांच्या दोन गटातून राज्यस्तर प्रदर्शानासाठी निवड करण्यात येते. जिल्हास्तरावरील बाल वैज्ञानिकांची निवड करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात यावी. सदर गटातून मुख्यमंत्री विद्यार्थी वारीतील विद्यार्थ्यांना बंगळूरू येथील इस्त्रो (ISRO) केंद्राला भेट देण्यासाठी खालीलप्रमाणे निवड करावी :-

| अ. क्र. | गट | राज्यस्तर प्रदर्शनासाठी जिल्हास्तरावर निवड करावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या. |
|---|---|---|
| १ | प्राथमिक विद्यार्थी गट (सर्वसाधारण) | १ X ३७ = ३७ |
| २ | प्राथमिक विद्यार्थी गट (दिव्यांग) | १ X ३७ = ३७ |
| ३ | प्राथमिक विद्यार्थी गट (आदिवासी) | १ X १६ = १६ |
| ४ | माध्यमिक विद्यार्थी गट (सर्वसाधारण) | १ X ३७ = ३७ |
| ५ | माध्यमिक विद्यार्थी गट (दिव्यांग) | १ X ३७ = ३७ |
| ६ | माध्यमिक विद्यार्थी गट (आदिवासी) | १ X १६ = १६ |
| **एकूण** | | **१८०** |

उपरोक्तनुसार, राज्यातील जिल्हा स्तरावरील प्राथमिक व माध्यमिक (सर्वसाधारण गट), प्राथमिक व माध्यमिक (दिव्यांग गट) आणि प्राथमिक व माध्यमिक (आदिवासी गट) मधून निवड झालेल्या १८० विद्यार्थ्यांसोबतच्या ०८ पर्यवेक्षक/ विज्ञान शिक्षक यांना बंगळूरू येथील इस्त्रो (ISRO) केंद्राला भेट देण्यासाठी प्रतिव्यक्ती कमाल रु. ३५,०००/- इतका खर्च त्या-त्या जिल्हास्तरावरील जिल्हा योजनेत (DPDC) तरतूद करावी.

(५) जिल्हास्तरावरील विद्यार्थ्यांची निवड करणे व भेटीचे नियोजन करणे याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक यांची राहील. त्यानुसार, गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत भेटीच्या सर्व खर्चाचा हिशोब संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांच्याकडे सादर करावा.

(६) उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतचे विद्यार्थी) आणि माध्यमिक व उच्च माध्यमिकस्तर (इयत्ता ९ वी ते १२ वीचे विद्यार्थी) गटाकरिता राज्यस्तरीय उत्कृष्ट ५१ बाल वैज्ञानिक विद्यार्थ्यांची व ०४ प्रशासकीय अधिकारी/ विज्ञान शिक्षक यांची अमेरिका येथील नासा (NASA) भेटीच्या वारीकरिता निवड संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात यावी. सदर समितीने अमेरिका येथील नासा (NASA) भेटीचे नियोजन करावे.

(७) मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारीतील नासा (NASA) येथील केंद्रास भेटीसाठी ५१ विद्यार्थ्यांची निवड खालीलप्रमाणे करण्यात यावी :-

| अ. क्र. | गट | राष्ट्रीयस्तर प्रदर्शनासाठी राज्यस्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या. | राष्ट्रीयस्तर प्रदर्शनासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त गुणानुक्रमे निवड करावयाची विद्यार्थी संख्या | मुख्यमंत्री विज्ञान वारीकरिता निवड करावयाची एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक विद्यार्थी गट (सर्वसाधारण) | ७ | १० | १७ |
| २ | प्राथमिक विद्यार्थी गट (दिव्यांग) | २ | २ | ४ |
| ३ | प्राथमिक विद्यार्थी गट (आदिवासी) | २ | २ | ४ |
| ४ | माध्यमिक विद्यार्थी गट (सर्वसाधारण) | ७ | ११ | १८ |
| ५ | माध्यमिक विद्यार्थी गट (दिव्यांग) | २ | २ | ४ |
| ६ | माध्यमिक विद्यार्थी गट (आदिवासी) | २ | २ | ४ |
| **एकूण** | | **२२** | **२९** | **५१** |

३. राज्यस्तरावरील विज्ञान प्रदर्शनात निवड झालेल्या ५१ विद्यार्थी व सोबत जाणाऱ्या ४ प्रशासकीय अधिकारी/ विज्ञान शिक्षकांकरिता ८ दिवसांच्या कालावधीतील अमेरिका येथील नासा (NASA) भेटीच्या वारीकरिता विमान प्रवास खर्च, व्हिसा खर्च, निवास व्यवस्था तेथील प्रवास खर्च यामध्ये वेळोवेळी होणारी वाढ विचारात घेऊन प्रतिव्यक्तींसाठी कमाल रु. ६,००,०००/- याप्रमाणे ५५ व्यक्तींच्या रु. ३,३०,००,०००/- इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी मागणी क्र. ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०१,

प्राथमिक शिक्षण, १०७ शिक्षक प्रशिक्षण, (०२) अशासकीय शिक्षणशास्त्र कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य, (०२) (०६), राज्य विज्ञान संस्थांना त्या चालवित असलेल्या अनेक कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी सहाय्य (कार्यक्रम), (२२०२ एच ८६६), ३१-सहायक अनुदाने, (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली आर्थिक वर्षात नमूद लेखाशीर्षातील उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक २४ मार्च, २०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५०६१५३३२००६२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=Personal, title=9656, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, postalCode=400089, st=Maharashtra, serialNumber=1a39cef3c157b9ee6a2abe5779acf233682613f7b9c335d6bf4877267695ceca, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2026.05.06 15:34:15 +05'30'

**(तुषार महाजन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

**१.** मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
**२.** मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
**३.** मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
**४.** मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रीडा आणि युवक कल्याण), यांचे सचिव मंत्रालय, मुंबई.
**५.** मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, सर्व.
**६.** मा.विधानसभा/ विधान परिषद सदस्य, विधान भवन (मुंबई सर्व).
**७.** मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
**८.** अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
**९.** अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
**१०.** मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
**११.** आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
**१२.** राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
**१३.** आयुक्त, महानगरपालिका, सर्व.
**१४.** संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
**१५.** संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
**१६.** जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.

**१७.** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.

**१८.**शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

**१९.**शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

**२०.** शिक्षण संचालक (निरंतर), महाराष्ट्र राज्य, पुणे.

**२१.**संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

**२२.**संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे.

**२३.** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.

**२४.** विभागीय शिक्षण उप संचालक, सर्व.

**२५.** शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक/ निरंतर), जिल्हा परिषद, सर्व.

**२६.** मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगर परिषद, सर्व.

**२७.** निवड नस्ती (कार्यासन-एसडी-१).